Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 06 – 11
DOI: 10.5281/zenodo.10071251

Original Research Article

# महात्मा गांधी आणि सत्याग्रह

प्रा. डॉ. डी. आर. पाटील

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, चिखली
ता. शिराळा, जि. सांगली ४१५४०८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: drpatil7090@rediffmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी १८९१ मध्ये ब्रिटन मध्ये कायद्याचे पदवीधर झाले आणि त्यानंतर भारतात परतल्यानंतर गुजरात येथील राजकोट मध्ये वकिलीचा व्यवसाय सुरु केला. गुजरात मधील पोरबंदर येथील एका गुजराती व्यापाऱ्याची केस लढण्यासाठी ते दक्षिण आफ्रिकेला गेले आणि इथेच त्यांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाली. दक्षिण आफ्रिकेतच त्यांनी सत्याग्रहाला सुरुवात केली आणि केवळ भारतालाच नाही तर जगाला सत्याग्रहाचा एक सनदशिर व अहिंसक मार्ग सापडला. दक्षिण आफ्रिकेतील तत्कालीन सरकारने केलेल्या कायद्यान्वये आशियाई व भारतीयांना या कायद्याचा मोठा त्रास व्हायचा.भारतीय लोकांची या कायद्यामुळे खूप पिळवणूक व्हायची.पण सत्याग्रह या सनदशीर शस्त्राचा वापर करून महात्मा गांधींनी या कायद्यात सुधारणा करणे आफ्रीकेतील तत्कालीन ट्रान्सव्हाल सरकारला भाग पडले. यातूनच जगाला महात्मा गांधींनी सत्याग्रहासारखे एक शस्त्र समाजाला दिले, ज्याद्वारे अन्याय करणाऱ्याच्या विरोधामध्ये या शस्त्राचा वापर करून न्याय मिळवणे केवळ भारतीयांना अथवा आफ्रिकन लोकांनाच नव्हे तर जगाला शक्य झाले.

**महत्वाचे शब्द:** महात्मा गांधी, सत्याग्रह, हरताळ

## सत्याग्रह शब्दाची उत्पत्ती

सत्याग्रह याचा अर्थ सत्यासाठी आग्रह धरणे असा होतो. मात्र या शब्दाचा उगम केव्हापासून आणि कुठे झाला याबाबत आपणाला माहिती करून घेणे गरजेचे आहे. महात्मा गांधी म्हणावे इतके प्रभावी वक्ते नव्हते. पण ते प्रभावी वक्ते नसले तरी त्यांची वाणी प्रभावी होती. समोरच्यांच्या मनाला भिडणारे त्यांचे शब्द धारदार आंदोलने आणि चळवळ उभा करत होते. 'इंडियन ओपीनियन' या वर्तमानपत्रातून लिहिताना त्यांनी एकता 'पॅसिव्ह रेजिस्टन्स' (निःशस्त्र प्रतिकार) हा

इंग्रजी शब्द वापरला. परंतु त्यांना अभिप्रेत असलेला नेमका अर्थबोध समोरच्यांना होत नव्हता. असे त्यांना सातत्याने वाटत होते. म्हणूनच त्यांनी यास लढ्यास योग्य प्रतिशब्द सुचवा म्हणून एक स्पर्धा जाहीर केली आणि एक छोटीशी बक्षीसही ठेवले. अनेकांनी या स्पर्धेत भाग घेतला. मगनलाल गांधी यांनी 'सदग्रह' शब्द सुचवला परंतु गांधीजींनी त्यात थोडासा बदल करून 'सत्याग्रह' हा शब्द तयार केला. सत्य आणि प्रेम यातून उभी राहणारी शक्ती. यामध्ये हिंसेला अजिबात थारा नाही. अशी या शब्दाची फोड महात्मा गांधी करतात. यापुढे महात्मा गांधींनी इंग्रजी वर्तमानपत्रात सुद्धा पॅसिव्ह रेजिस्टन्स हा शब्द वापरणे सोडून दिले व सत्याग्रह हाच शब्द ते वापरू लागले.[१] नि:शस्त्र प्रतिकार या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून सत्याग्रह या शब्दाची सुरुवात झाली. महात्मा गांधींच्या स्वातंत्र चळवळीमधील सहभागामुळे बहुजन व सामान्य जनता, स्त्री-पुरुष, विद्यार्थी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, अल्पभूधारक इत्यादी स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच्या चळवळीत सहभागी झाले. सत्याग्रहाच्या माध्यमातूनच महात्मा गांधींनी भारतीयांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्न हाती घेतले. इतकेच नव्हे तर त्या समस्या सोडवण्यासाठी त्या प्रश्नांना लोक चळवळीच्या आणि लोक आंदोलनाच्या माध्यमातून एक तात्विक अधिष्ठान दिले असल्याचे आपल्याला दिसते. महात्मा गांधींनी सांगितलेल्या सत्याग्रहाच्या संकल्पनेचा स्वीकार कोणीही करू शकत. होता मात्र सत्याग्रहीला कुटुंब स्नेहाचा त्याग करावा लागत असे. सत्याग्रह जर ती व्यक्ती मानत असेल तर त्याचे आचरण करणे म्हणजे तलवारीच्या पात्यावरून चालण्यासारखे होते. महत्त्वाचे म्हणजे सत्याग्रहीने जीवनात निश्चित सत्याला प्रथम स्थान दिलेले असावे आणि आयुष्य आहे सत्याच्या प्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन मानले जावे. संपत्ती आणि सत्य या दोन्ही टोकाच्या बाजू असून हा विरोध शेवटपर्यंत राहिला पाहिजे. जो संपत्तीला चिकटून राहतो तो सत्य पाळू शकत नाही; म्हणून सत्याग्रहीने संपत्तीचा मोह त्यागायला हवा. याचा अर्थ असा नव्हे की सत्याग्रही व्यक्तीजवळ संपत्ती असूच नये. संपत्ती असावी पण त्याचे स्थान आपल्या जीवनात दुय्यम असायला हवे. संपत्तीपेक्षा सत्याचे स्थान पहिले असायला हवे, असे गांधींचे मत होते.

**भारत ते दक्षिण आफ्रिका**

महात्मा गांधी कायद्याची पदवी घेण्यासाठी ब्रिटनला गेले.तेथे त्यांनी बॅरीस्टरची पदवी प्राप्त केली. कायद्याची सर्वोच्च पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी आपल्या गुजरात राज्यातील राजकोट या ठिकाणी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. याठिकाणी त्यांनी छोटे-मोठे खटले चालवून आपली छाप पाडली. लंडनमध्ये तीन वर्षे राहून कायद्याची पदवी घेऊन आलेल्या गांधींनी राजकोट मधील आपल्या वकिली व्यवसायात अल्पावधीत चांगली छाप पडली. याच दरम्यान भारतातील अनेक मजूर शेतमजुरी करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत पाठवले जात असत. त्याचप्रमाणे गुजरात मधील बरेचसे व्यापारी व्यापाराच्या निमित्ताने आफ्रिकेमध्ये स्थायिक झाले होते. दक्षिण आफ्रिकेमधील स्थानिक कृष्णवर्णीय व व भारतीयांना तेथील अन्यायकारक कायद्याने मोठा त्रास होत होता. दरम्यान आपल्या कोर्ट कामाच्या दाव्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील प्रिटोरिया येथे एका वकिलाची गरज गुजरात मधील व्यापाऱ्यास होती. सदरचा दावा चालवण्यासाठी गोधींची निवड झाली.यानिमित्ताने त्यांचा पहील्यांदा भारतातून दाक्षिण आफ्रिकेला प्रवास झाला. जातानाच त्यांना आपल्या बरोबर काळा सहप्रवासी नको म्हणून त्यांना रेल्वेच्या डब्यातून बाहेर ढकलण्यात आले. पहिल्या वर्गाचे तिकिट असतांनासुद्धा त्यांना पीटरमारित्झबर्गमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांनी तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसण्यास सांगितले. गांधीजीनी नकार देताच त्यांना अपमान करून आगगाडीमधून ढकलून देण्यात आले. ती संपुर्ण रात्र गांधीनी फलाटावरील गेस्टरूममध्ये काढली. गांधीनी ठरवले असते तर उद्दाम वर्तन करणाऱ्या त्या रेल्वे अधिकाऱ्यास ते अद्दल घडवू शकले असते. पण सूडभावनेने कोणाला शिक्षा करविणे हा त्यांचा हेतू नव्हता; तर अन्यायकारक व्यवस्था बदलवणे हा त्यांचा हेतू होता. तेव्हाच महात्मा गांधी यांना दाक्षिण आफ्रिकेतल्या वंशवादाची कल्पना अगदी जवळून आली. येथूनच पुढे त्यांनी हिंदी लोकांवरील अन्याय निवारण्यासाठी दाक्षिण आफ्रिकेत पुढील काही वर्षे वाहून घेतले.

**दक्षिण आफ्रिकेतील कार्य**

महात्मा गांधी यांच्या सार्वजनिक जिवनाचा व कार्याचा पाया खऱ्या अर्थाने दक्षिण आफ्रिकेत घातला गेला. ते 'सत्याग्रह' या विचार प्रणालीचे जन्मदाते मानले जातात.महात्मा गांधींनी सत्याग्रह या तंत्राचा वापर दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी केला.दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची राजकीय गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्याचा सर्वकष लढा उभारला. ब्रिटिश राजवटीच्या जुलमी, अन्यायी व अत्याचारी कारभाराच्या विरोधात त्यांनी दंड थोपटले. ते ब्रिटिशांचे विरोधात सनदशीर मार्गाने लढत असताना त्यांनी उभा केलेल्या चळवळींना लढ्यांना आंदोलनांना आणि सत्याग्रहाला एक तात्विक अधिष्ठान दिले. हे करत असताना त्यांनी या संदर्भातले आपले समर्पक विचारही प्रस्तुत केले.म्हणूनच गांधींचा विचार पुढे ‘गांधीवाद’ म्हणून ओळखला जाऊ लागला. याच विचारापैकी एक असलेला विचार म्हणजे सत्याग्रह.

सत्याग्रहाचा अवलंब करून कोणतेही रास्त उद्दिष्ट साध्य करता येते. सत्याग्रह हा अत्यंत उच्च प्रतीचा व अचूक असा उपाय आहे. ती अत्यंत महान शक्ती आहे सत्याग्रहाणे समाजातील राजकीय,आर्थिक आणि नैतिक अशा सर्व अनिष्ट प्रवृत्ती नाहीशा करता येतात असे महात्मा गांधी समजत.[२] दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सवाल सरकारने २२ ऑगस्ट १९०६ च्या एक्स्ट्रा ऑर्डिनरी गॅझेटमध्ये एक मसुदा प्रसिद्ध केला होता. या मसुद्याला ‘आशियायी सुधारणा कायदा’ असे नाव दिले. पुढे याच वटहुकूमास कायदेमंडळात संमती मिळताच त्याचे कायद्यात रूपांतर होते. हा कायदा दक्षिण आफ्रिकेमध्ये राहणाऱ्या आशियाई आणि भारतीय लोकांना जाचक आणि तितकाच अपमानास्पद कायदा होता. या कायद्यान्वये ट्रान्सवालमध्ये राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांनी आपली आपण इथले रहिवासी असल्याची नोंद करणे आवश्यक होते. शिवाय हे नोंद केलेले नोंदणी पत्रक प्रत्येक वेळी आपल्याजवळ ठेवून त्याबाबत कोणी विचारणा केल्यास ते दाखवणे सक्तीचे होते. या नोंदणीमध्ये संबंधित व्यक्तीच्या अंगावरील खुणा,बोटांचे ठसे घेतले जात. महात्मा गांधींनी हा मसुदा वाचला व याला कडाडून विरोध करण्याचे निश्चित केले. त्यांनी तेथील भारतीयांना साद घातली आणि सत्याग्रहाच्या मार्गाने तत्कालीन सरकारला विरोध केला. महात्मा गांधींची सत्याग्रहाची सुरुवात दक्षिण आफ्रिकेतून झाली. गांधीजी जवळपास २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेमध्ये राहिले व तिथल्या अन्यायी अत्याचारि कायदे कानून यांना अहींसक सत्याग्रही मार्गाने विरोध केला व ते बदलण्यास भाग पाडले.

**महात्मा गांधींचे सत्याग्रही तत्वज्ञान व भारत**

महात्मा गांधी १९१५ मध्ये भारतात परतले. यावेळी भारतीय राजकारणावर लोकमान्य टिळक यांचा जहालवादाचा आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मवाळवादाचा भारतीय राजकारणावर चांगलाच प्रभाव होता. त्यामुळे महात्मा गांधींनी १९१५ ते १९२० पर्यंत वेगवेगळया चळवळी आणि आपले विचार प्रस्तुत करुन सर्वसामान्य लोकांची मने आपल्याकडे वळवली. २५ मे १९१५ या दिवशी महात्मा गांधींनी अहमदाबाद जवळील ‘कोचरब’ खेड्यात सत्याग्रह आश्रम सुरू केला. या आश्रमामध्ये गांधींनी दुदाभाई यांची पत्नी दादीबेन आणि मुलगी लक्ष्मी या अस्पृश्य समजलं जाणाऱ्या जातीत जन्मलेल्या कुटुंबास आश्रमात प्रवेश दिल्याने एकच खळबळ उडाली. याचा परिणाम म्हणून या आश्रमास आर्थिक सहाय्य करणाऱ्यांनी आपले हात आखते घेतले. इतकेच नव्हे तर कस्तुरबा आणि गांधी कुटुंबातील अन्य स्त्रियांनीही नापसंती व्यक्त केल्याने महात्मा गांधींना काही काळ अडचणींना सामोरे जावे लागले.[३]

महात्मा गांधींच्या भारतातील सत्याग्रहाची सुरुवात चंपारण्य येथील नीळ कामगारांच्या प्रश्नाने सुरू झाली. हा लढा शेवटपर्यंत सनदशिर मार्गाने लढला गेला आणि या लढ्यामध्ये सुमारे २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी ब्रिटिशा विरोधामध्ये महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवून सहभाग नोंदवला.येथूनच खऱ्या अर्थाने महात्मा गांधींच्या सत्याग्रहाची प्रचिती भारतीयांना आली आणि सत्याग्रहांमध्ये असलेल्या ताकदीची कल्पनाही आली. चंपारण्य येथे

असलेल्या शेतकऱ्यांनी अनेकदा जमीनदारांच्या विरोधामध्ये उठाव केले होते. कधी हिंसक तर कधी न्यायमार्गाने हे उठाव झाले. परंतु येथील शेतकऱ्यांना नेहमीच दाबून टाकण्यात आले किंबहूना हे शेतकऱ्यांचे उठाव मोडून काढण्यात आले.चहाचे मळे, कापडाच्या आणि तागाच्या गिरण्या ही भारतातील ब्रिटिश राजवटी मधील पहिले संघटित उद्योग होते. हेच उद्योग संपवण्याचा ब्रिटिशांचा डाव होता.

महात्मा गांधींनी सत्याग्रह करत असताना त्याचे वेगळे टप्पे अथवा वेगवेगळे प्रयोग केले. अहमदाबाद मध्ये कापड गिरण्यांचे मालक व कामगार यांच्यात पगारवाढीच्या कारणातून संघर्षाला सुरुवात झाली. कामगारांनी पन्नास टक्के वेतन वाढ मागितली परंतु गिरणी मालकांनी याच्या वीस टक्के पगार वाढ देण्याची तयारी दर्शवली. हा तोडगा कामगारांना मान्य झाल्याने गांधीजींनी मात्र यात तोडगा काढून पस्तीस टक्के पगार वाढ स्वीकारावी यासाठी कामगारांचे मतपरिवर्तन केले. अहमदाबाद गिरणी कामगारांचा प्रश्न महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून सोडवला.या गिरणी कामगारांच्या चळवळी मधूनच गिरणी कामगारांची एक संघटना उदयास आली. मजूर, कामगार संघटित झाला. त्यानंतर खऱ्या अर्थाने कामगार संघटनांना दिशा मिळाली.[४]

अशाच प्रकारे महात्मा गांधींनी रौलट ॲक्ट अर्थात काळा कायदा याविषयी सत्याग्रह घडवून आणला. The Archical and Revolutionary Act मार्च १९१९ मध्ये न्या. सिडने रौलेट कमिटीच्या शिफारशीनुसार केला गेला होता.म्हणूनच याला रौलेट ॲक्ट या नावाने ओळखले गेले. पहिले महायुद्ध संपले होते आणि भारतात राजकीय असंतोषाने जोर पकडणार होता, या पार्श्वभूमीवर तो कायदा आला होता. त्यानुसार कोणत्याही भारतीय व्यक्तीला विनाचौकशी पकडण्याचा व विनाखटला दोन वर्षापर्यंत तुरुंगात टाकण्याचा अधिकार पोलीस प्रशासनाला प्राप्त झाला होता. म्हणजे देश विघातक कृत्य करण्याची शक्यता असलेल्या किंवा तसेच संशय असलेल्या कोणालाही त्या कायद्यानुसार अटक करता येणार होती. त्यासाठी कोणतेही पुरावे देण्याची बंधन पोलिसांवर नव्हते.[५]

या कायद्यान्वये कोणत्याही परवानगीशिवाय भारतीय नागरिकांना केवळ संशयावरून पकडले जात होते व शिक्षा दिली जात होती. या कायद्यान्वये भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा येत होती आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेला यामुळे मोठा धोका निर्माण झाला होता. या बिलाच्या विरोधातही महात्मा गांधींनी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. सत्याग्रह हा आत्मशुद्धीचा लढा आहे. हा धार्मिक लढा आहे. धर्मकार्याची सुरुवात आत्मशुद्धीपासून करावी हे योग्य दिसते. त्या दिवशी सर्वांनी उपवास करावा व काम धंदा बंद करावा. मुसलमान बंधू रोजा पलीकडे जास्त उपवास पाळणार नाहीत. त्यासाठी उपवास चोवीस तास पाळण्याची सूचना करावी. यात सर्व प्रांत भाग घेतील की नाही सांगता येत नाही. मुंबई, मद्रास, बिहार व सिंध एवढ्यांची मला आशा आहे.एवढ्या ठिकाणी बरोबर हरताळ पडला तरी आपण संतोष मानला पाहिजे.[६] असे गांधीजींनी या सत्याग्रहाची सुरुवात करण्यापूर्वी सुचित केले होते. परिणामी मार्च १९२२ मध्ये रौलट ॲक्ट व आणखी २१ कायदे रद्द करत असल्याचे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. या कायद्याच्या विरोधातील आंदोलनाने देशात गांधी युग अवतरले. विशेष म्हणजे या कायद्याचे विरोधात सत्याग्रहाणे एवढा जोर पकडला की त्या कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात देशात कधीच झाली नाही. अशाच प्रकारे महात्मा गांधी यांनी मिठाचा सत्याग्रह, सविनय कायदेभंग चळवळ, चलेजाव चळवळ, संपूर्ण स्वराज्य, दारूबंदी चळवळ, असहकार चळवळ, आमरण उपोषण या सर्वासाठी सत्याग्रहाचाच वापर केला आणि यशस्वी झाले. एका अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळाले ते ह्या सत्याग्रहाच्याच मार्गाने मिळाले असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

सत्याग्रहाच्या रुपाने सामूहिक कृतीचा एक मार्ग गांधींनी दाखवला आहे. मार्क्सच्या सामूहिक कृतीपेक्षा गांधींना अभिप्रेत असलेली 'सामूहिक कृती' निराळी आहे. मार्क्स प्रमाणे त्यांची सामूहिक कृतीही विशिष्ट वर्गाची नाही. दक्ष

कार्यकर्त्यापेक्षा अधिक कठोर व बिकट अशा तयारीची व शिस्तीची आवश्यकता गांधींच्या सत्याग्रहीला आहे; कारण तशी त्यांची स्वतःची तयारी झाल्याखेरीज इतरांसमोर तो आदर्श निर्माण करु शकणार नाहीत.[७] असे गांधी मानत. सत्याग्रहाचा वापर वैयक्तिकरित्या तसाच सामूहिकरित्या करता येऊ शकतो. या दोन्ही प्रकारांची उदाहरणे महात्मा गांधींनी स्वतः दिली होती. दोन्ही प्रकारांची काही समान वैशिष्ट्ये होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दोन्ही सत्याग्रह हे नैतिक पातळीवर अहिंसक मार्गानेच करायचे होते. यासत्याग्रहाचे यश-अपयश हे नैतिक मूल्यांच्याच परीमानाने मोजावे, अशा प्रकारे सत्याग्रह झाला पाहिजे अशी गांधींची धारणा होती. सत्याग्रह हा नेहमीच समाजाच्या कल्याणासाठी, समाजाच्या उद्धारासाठी केला जाऊ शकतो. मात्र सत्याग्रहाचा वापर वैयक्तिक स्वार्थ अथवा लाभासाठी कधीही केला जाऊ नये अशी त्यांची विचारसणी होती.

सत्याग्रहाच्या यशस्वी उपयोगा करता पहिली आवश्यक गोष्ट गांधींच्या मते जर कोणती असेल तर ती म्हणजे शरीराहून निराळे असे आत्म्याचे अस्तित्व मान्य असायला पाहिजे. ती शरीरापेक्षा श्रेष्ठ व चिरंतन आहे अशी श्रद्धा पाहिजे. या श्रद्धेतूनच सत्याग्रही आपल्या विरोधकावर विश्वास ठेवू शकेल. वीस वेळा प्रतिस्पर्ध्याकडून फसवणूक झालेला सत्याग्रही एकवीसाव्या वेळीही त्यांच्यावर विश्वास ठेवला तयार होऊ शकेल. कारण मानवी स्वभावावरील अंतरिक विश्वास हा सत्याग्रहाचा गाभा आहे.[८]

**निष्कर्ष**

सत्याग्रह हे अन्यायाविरुद्ध लढण्याचे एकमेव शस्त्र होते. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या कल्पनेने सत्याची शक्ती आणि सत्याचा शोध घेण्याची गरज अधोरेखित केली गेली. महात्मा गांधींचे आचरण आणि कार्यपद्धती यामुळे सत्याग्रह ही जनआंदोलनाची एक अभिनव पद्धत बनली. ज्यात सत्य, सहिष्णुता, अहिंसा आणि शांततापूर्ण निषेध या तत्त्वावर जोर देण्यात आला होता. सत्याग्रह हा अन्यायाचा प्रतिकार करण्याचा एक अभिनव मार्ग मानला गेला. देश सशस्त्र लढ्यात इंग्रजांना पराभूत करू शकत नव्हता. निष्क्रीय प्रतिकाराची ही पद्धत सत्यावर आधारित होती आणि अत्याचार करणाऱ्याच्या विवेकाला आकर्षीत करु शकत होती. परीणामी अनेक जुलमी कायदे कानून आणि प्रथा, परंपरा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या प्रयोगाने बदलल्या. हाच सत्याग्रहाचा मार्ग देशाला स्वातंत्र्याकडे घेवून गेला.

**अवघड शब्द**

सत्याग्रह : सद् ग्रह, सत्य + आग्रह
पॅसिव्ह रेजिस्टन्स : निःशस्त्र प्रतिकार
हरताळ : सनदशीर संप, बंद
ट्रान्सव्हालसरकार : ब्रिटीश शाशन

**संदर्भ सूची**

१. जोशी यशवंत, गांधीगीता, मैत्रेय प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, जून-२००९, पृ. ७१
२. प्रभू आर.के., राव यु. पी. (संपा.) दि माईंड ऑफ महात्मा गांधी, पृ. १७२
३. फडके य. दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-२, के. सागर पब्लीकेशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २००५, पृ. ५९

४. धाये राजेंद्र साहेबराव, गांधी आंबेडकर यांची सत्याग्रह चळवळ एक चिकित्सक अभ्यास, (पीएचडी प्रबंध) २००७, पृ. ११६
५. शिरसाठ विनोद (संपा.), साप्ताहिक साधना, ११ जानेवारी २०२०, पृ. ४
६. गांधी मो. क., सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनु.) सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, दहावीआवृत्ती, २००४, पृ. ४३४
७. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचारविचार, पिंपळापुरे अ‍ॅण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जून २००३, पृ.४७६
८. उपरोक्त, पृ. ४७७